# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.07.2025** **वारःमंगळवार**

---

•प्रकृतीच्या कारणास्तव उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा

•संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात; हे अधिवेशन आपल्या सामूहिक यशाचा विजयोत्सव असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

•अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी पहलगाम दहशतवादी हल्ल्यासह विविध मुद्द्यांवरून विरोधकांचा गदारोळ; लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

•२००६च्या मुंबई उपनगरी रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता; मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

•आणि

•क्रिएटर्स इकॉनॉमीसाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या उद्देशानं राज्य सरकारचा ‘एफटीआयआय’शी करार

**<u>उपराष्ट्रपतीराजीनामा</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणामुळे आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आरोग्याशी निगडीत कारणं आणि वैद्यकीय उपचारांसाठी आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याचं जगदीप धनखड यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. आपल्या कार्यकाळात राष्ट्रपतींनी केलेल्या सहकार्यासाठी त्यांनी आभार व्यक्त केले आहेत. त्याचबरोबर धनखड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सर्व केंद्रीय मंत्र्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे.

पंतप्रधानांचं अमूल्य सहकार्य आणि संसद सदस्यांकडून मिळालेला स्नेह आपल्या स्मृतींमध्ये कायम राहील असं धनखड यांनी म्हटलं आहे. परिवर्तनाच्या या युगात भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये योगदान देता आलं, ही आपल्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे असंही धनखड यांनी म्हटलं आहे.

**<u>संसद</u>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या कालच्या पहिल्याच दिवशी पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी चर्चा करण्याच्या मागणीवरून विरोधी पक्षांनी दोन्ही सभागृहात घोषणाबाजी केली. त्यामुळे दोन्ही सभागृहांच्या कामकाजात व्यत्यय आला. पहलगाम हल्ल्याच्या मुद्द्यावर चर्चेसाठी सरकार तयार असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू तसंच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लोकसभेत सांगितलं. मात्र तरीही विरोधकांनी गदारोळ सुरूच ठेवला; त्यामुळे सभागृहाचं कामकाज आधी तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लॅडिंग विधेयक २०२५ ला काल संसदेची मंजुरी मिळाली. जलवाहतूक कागदपत्रांची कायदेशीर प्रक्रिया सुलभ करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. लोकसभेत हे विधेयक यावर्षी मार्च महिन्यात मंजूर झालं होतं; काल राज्यसभेत हे विधेयक मंजूर झालं.

सशक्त लोकशाहीत द्वेषाला काही जागा नाही; असं प्रतिपादन राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी काल केलं. राजकीय पक्षांच्या सदस्यांनी एकमेकांशी सौहार्द आणि आदराने वागावं, आणि अशोभनीय भाषेचा वापर टाळावा असं आवाहन त्यांनी राज्यसभेत बोलताना केलं.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसद भवन परिसरात वार्ताहरांशी संवाद साधला. हे अधिवेशन देशासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या सामूहिक यशाचा विजयोत्सव आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

संपूर्ण जगाने भारताच्या लष्करी सामर्थ्याची ताकद पाहिली आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्याने ठरवलेलं लक्ष्य पूर्णपणे साध्य झालं, असं पंतप्रधान म्हणाले. भारतीय अर्थव्यवस्था वेगानं प्रगती करत असून जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दृष्टीनं आपली वाटचाल सुरु आहे, असं ते म्हणाले. अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांच्या खासदारांनी सहकार्य करावं, अशी विनंती पंतप्रधानांनी यावेळी केली. ते म्हणाले

**<u>बाईट – मोदी</u>**

मैं इस वास्तविकता को स्वीकार करता हूं कि दलहित में मत भले ही न मिले, लेकिन देशहित में मन जरूर मिले। इसी एक भावना के साथ इस मॉनसून सत्र से देश के विकास यात्रा को बल देने वाले, देश की प्रगति को बल देने वाले, देश के नागरिकों को सामर्थ्य देने वाले अनेक विधेयक प्रस्तावित हैं। सदन विस्तृत चर्चा करके उसको भी पारित करेगा।

**<u>बॉम्बस्फोट</u>**

मुंबईत लोकल रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातल्या सर्व १२ आरोपींना सबळ पुराव्याअभावी काल मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केलं. या १२ पैकी पाच आरोपींना फाशीची शिक्षा, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. न्यायालयाने या सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश दिले. या घटनेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ आणि आरोपींकडून हस्तगत केलेलं साहित्य तसंच, कबुलीजबाब या तिन्ही पातळीवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा सिद्ध करण्यात तपास यंत्रणा अपयशी ठरल्याचं न्यायाधीश अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या खंडपीठाने या निकालावेळी स्पष्ट केलं. या प्रकरणातल्या एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नसल्याचं निरीक्षणही न्यायालयाने नोंदवलं. मुंबईत ११ जुलै २००६ रोजी लोकल गाड्यांमध्ये सात साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या बॉम्बस्फोटांमध्ये १८९ जण मृत्युमुखी पडले, तर ७०० हून अधिक जण जखमी झाले. तर अनेकजण आयुष्यभरासाठी जायबंदी झाले. या खटल्यात विशेष मकोका न्यायालयानं सप्टेंबर २०१५ मध्ये १२ जणांना दोषी ठरवलं होतं.

दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय आमच्यासाठी अत्यंत धक्कादायक आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्य सरकार या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचं त्यांनी काल मुंबईत माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>इंट्रो</u>**

**<u>क्रिएटर्सइकॉनॉमी</u>**

महाराष्ट्र हे देशाच्या आणि जगाच्या क्रिएटर्स इकॉनॉमीचे केंद्र बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्य विभाग, पुण्यातील फिल्म अ‍ॅण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, मुंबईतील महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यात काल सामंजस्य करार करण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, एफटीआयआयचे अध्यक्ष आर. माधवन; सांस्कृतिक कार्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्यासह अन्य मान्यवर

यावेळी उपस्थित होते. क्रिएटर्स इकॉनॉमीच्या विकासासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशानं हा करार महत्त्वाचा ठरणार आहे; यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले...

**Byte : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

हे जे कोलॅबोरेशन आपण केलेलं आहे हे अतिशय उत्तम अशा प्रकारचं कोलॅबोरेशन आहे कारण दोन व्हायब्रंट इको सिस्टम्स हे इतके वर्ष महाराष्ट्रामध्ये काम करत आहेत. एफटीआयनी देशाला आणि जगाला इतके उत्तम अशा प्रकारचे आर्टिस्ट दिलेले आहेत की ज्यांनी वर्ल्ड सिनेमाला एक वेगळा शेप दिलेला आहे आणि त्याचवेळी अतिशय एंटरटेनिंग या प्रकारच्या फिल्म्स या आपल्या फिल्म सिटीने देखील भारताला दिलेल्या आहेत जगाला दिलेल्या आहेत त्यामुळे या दोन इकोसिस्टम एकत्रित आणणं मला असं वाटतं की आपण असं म्हणतो की हे एरा ऑफ कोलॅबोरेशन कोलॅबोरेटिव्ह जग आहे कोलॅबोरेटिव्ह जगामध्ये या दोन इकोसिस्टम एकत्रित आल्यामुळे जी तिसरी इकोसिस्टम जन्माला येणार आहे ती अतिशय क्रिएटिव्ह असेल याबद्दल माझ्या मनामध्ये कुठलीही शंका नाही

या करारामुळे गावखेड्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल. गावखेड्यातील मुलांनी आता चित्रनगरीकडे करिअर घडविण्याच्या उद्देशाने पाहावे असं सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी यावेळी सांगितले.

**फेलोशिप**

मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमात सहभागी युवकांना सार्वजनिक धोरण प्रमाणपत्र अभ्यासक्रम देण्यासंदर्भात काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नियोजन विभागाने मुंबईतल्या पवई इथल्या आयआयटी संस्थेबरोबर सामंजस्य करार केला. या अभ्यासक्रमामुळे तरुणांच्या क्षमतांमध्ये वाढ होणार असून त्यांना अधिक प्रभावीपणे काम करता येईल, असं प्रतिपादन फडणवीस यांनी यावेळी केलं.

**राकाँस्थास्व**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका महायुती म्हणून लढवणार असून स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेण्यासाठी संपर्क अभियान राबवत असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिली आहे. ते काल धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. लातूरमध्ये छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांबरोबर झालेल्या मारहाणीच्या घटनेमुळे पदाधिकारी सुरज चव्हाण याला पक्षातून बडतर्फ करण्यात आल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. दरम्यान या मारहाणीच्या घटनेच्या निषेधार्थ काल लातूरमध्ये सर्वपक्षीय

बंद पुकारण्यात आला होता. या घटनेतील आरोपींवर कडक कारवाई करण्याच्या मागणीसाठी परभणीतही संभाजी ब्रिगेडच्या वतीने काल निषेध आंदोलन करण्यात आलं.

**पीकविमा**

राज्य शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेत बदल केला असून, एक रुपयात असणारी पीक विमा योजना बंद केली आहे. यंदा खरीप हंगामासाठी नव्याने धोरण आणलं असून पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक योजनेतंर्गत शेतकरी ओळख क्रमांक आणि  ई-पीक पाहणीही शासनानं बंधनकारक केली आहे. शेतकऱ्यांनी हप्त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही शुल्क न देण्याचं आवाहन पुणे कृषी विभागाने केला आहे.

**बुद्धिबळ फिडे**

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळस्पर्धेत भारताची आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख हिनं उपांत्य फेरीत प्रवेश केलाआहे. उपांत्य फेरीत पोहोचलेली ती दुसरी भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. रॅपिड टायब्रेक मध्ये दिव्यानं आपल्याच देशाची ग्रँड मास्टर हरिका द्रोणवल्लीचा २-० असापराभव केला. आता ती अंतिम चारच्या लढतीत आपल्याच देशाची ग्रँड मास्टर कोनेरू हम्पीसोबत सामील झाली असून उपांत्य फेरीत दिव्याचा सामना चीनच्या ग्रँड मास्टरतानझोंगीशी होणार आहे. तर आज संध्याकाळी हम्पीचा सामना दुसरी चिनी ग्रँड मास्टरलेई टिंगजीशी होणार आहे.

**हवामान**

मुंबई आणि उपनगरात काल दिवसभर पावसाची संततधार सुरू होती.  नांदेड जालना आणि धाराशिव जिल्ह्यात काल रात्रीपासून पाऊस सुरु असल्यानं खरीप पिकांना जीवदान मिळालं आहे.

येत्या २४ तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात अनेक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार